# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**डॉ. सविता कुलकर्णी**
**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**


संदर्भ क्र. विविमं/२०२५-२६/६३१ **महत्वाचे** दि. २३/०२/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.

**विषय : हिंद दी चादर श्री. गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम/उपक्रमाबाबत.**

संदर्भ क्र. : १. महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग यांचे संदर्भ क्र.माअअ-२०२५/प्र.क्र.२०६/का.१-(०१) दिनांक १९ नोव्हेंबर, २०२५ चे पत्र.
२. महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग यांचे संदर्भ क्र. कार्या/साप्र-२/आरआर/९२/२०२६ दिनांक १६.०२.२०२६ चे पत्र
३. महाराष्ट्र शासन शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण) यांचे संदर्भ क्र.-संस/उशि/पुवि/हिंद-दी-चादर कार्यक्रम/ २०२६/पुणे विभाग/२४७९ दिनांक २०.०२.२०२६ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र. अविवि-२०२५/प्र.क्र.२०८/का-5, दिनांक १०.१०.२०२५ चे शासन निर्णयानुसार "हिंद दी चादर" श्री. गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त खारघर, नवी मुंबई येथे आयोजित करावयाच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव (डॉ. श्रीकर परदेशी) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६.०२.२०२६ रोजी झालेल्या आढावा बैठकीचे अनुषंगाने उपरोक्त कार्यक्रम विविध यंत्रणांच्या समन्वयाने यशस्वीरित्या पार पाडणेच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव यांनी दिनांक ०६.०२.२०२६ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये मुददा क्र. ६ मध्ये शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबधित सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये मुददा क्र. ६ (९) नुसार सदर स्पर्धेमध्ये सर्वोत्कृष्ट ठरणारे जिल्हानिहाय १५ विद्यार्थी व सर्वोत्कृष्ट ५ महाविद्यालये/मान्यताप्राप्त परीसंस्था यांची जिल्हास्तरीय व तालुकास्तरिय निवड समिती गठीत करुन त्याद्वारे सदर स्पर्धकांची निवड करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

तसेच दि. १५.०२.२०२६ रोजीच्या इतिवृत्तामध्ये नमूद केल्यानुसार अपर जिल्हाधिकारी, पुणे यांनी जिल्हास्तरीय सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या निवडीकरिता निर्धारण करणेत येणा-या कार्यपध्दतीची मुल्यांकन पध्दत निश्चित करुन दिलेली आहे. सदर मूल्यांकन पध्दतीची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

त्यानुषंगाने संदर्भीय बैठकांमध्ये दिलेल्या सूचनेनुसार महाविद्यालयांमध्ये खालील विषयांवर स्पर्धा आयोजित करावयात व यास्पर्धेतून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धानिहाय ०३ विद्यार्थ्यांची अंतिम निवड यादी तयार करावी ही स्पर्धानिहाय यादी विद्यार्थ्यांच्या (नाव, वर्ग, संपर्क क्रमांक, ई-मेल व इतर) संबंधित माहिती विद्यार्थी विकास मंडळाच्या bsd@unipune.ac.in या ई-मेलवर दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत पाठवावीत.

१. हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांचेविषयी फ्लायर्स, घोषवाक्य तयार करून घोषवाक्यासह विद्यार्थ्यांच्या हातामध्ये सकाळी प्रभातफेरी आयोजित करणे.
२. हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांचे जीवन आणि कार्य यावर आधारित तसेच राज्यातील शीख-सिकलीकर, बंजारा-लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन आणि भागात नामदेव संप्रदाय सामाजांचे गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्यासोबत असलेल्या ऐतिहासिक संबंध या विषयांवर वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, गायन, चित्रकला, दस्ताऐवजीकरण, वाचन व इतर स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे, वक्तृत्व स्पर्धा आणि निबंध स्पर्धा यांचे विषय https:/gurutegbaharshahidi.com या संकेतस्थळावर प्राप्त करून घ्यावे.
३. श्री. गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनकलावर आधारित वस्तुनिष्ठ बहुपर्यायी ५० प्रश्न असलेल्या स्पर्धात्मक परीक्षेचे आयोजन करणे.
४. महाविद्यालयामध्ये हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांनी दिलेल्या बलिदानाची माहिती व्यक्त करण्याच्या अनुषंगाने पंजाबी पार्श्वगायन श्री. सतिंदर सरताज यांच्याकडून तयार करण्यात आलेल्या गीताचे प्रसारण करणे.
५. हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांचे जीवन व कार्य यावर आधारित तयार केलेली डोक्यूमेंटरी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दाखविणे/ऐकविणे.

सदर उपक्रम विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. तसेच आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागांमध्ये आपणामार्फत आयोजित केलेल्या कार्यक्रम/उपक्रमांचा अहवाल शासनास सादर करावयाचा असल्याने आपला अहवाल विहित कालावधीत प्राधान्याने पाठविण्याबाबत संबंधितांना सूचित करावे. कळावे, ही विनंती.

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

# महाराष्ट्र शासन

शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)

पुणे विभाग, 17 डॉ. आंबेडकर रोड, पुणे-1

फोन नं. ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ E_mail ID- jdhepune@gmail.com


क्रमांक-संस/उशि/पुवि/हिंद-दी-चादर कार्यक्रम/२०२६/पुणे विभाग/2479 दिनांक -२०.०२.२०२६

प्रति,

कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे.

**विषय - "हिंद दी चादर" श्री. गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त खारघर, नवी मुंबई येथे आयोजित करावयाच्या कार्यक्रमासाठी समिती गठीत करणेबाबत..**

संदर्भ -
१. मा. मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई यांचेकडील ई-ऑफीस पत्र क्र. ९७२७६५०/५/२/२६
२. मा. अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र. अविवि-२०२५/प्र.क्र.२०६/का-५ दि. ९.२.२०२६.
३. या कार्यालयाचे पत्र क्र. ससं/उशि /पुवि/ परिपत्रक/2025 /ई-२४७९२४८ दि. १८.१२.२०२५.
४. मा. अप्पर आयुक्त, सा.प्र. पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र. कार्या/साप्र-2/कावि/९५/२०२६ दिनांक १८.२.२०२६.

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र. अविवि-2025/प्र.क्र.208/का-5, दिनांक 10/10/2025 चे शासन निर्णयानुसार "**हिंद दी चादर**" **श्री. गुरु तेग बहादुर साहिब जी** यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त **खारघर, नवी मुंबई येथे आयोजित करावयाच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने** मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव (डॉ. श्रीकर परदेशी) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६.२.२०२६ रोजी झालेल्या आढावा बैठकीचे अनुषंगाने उक्त कार्यक्रम विविध यंत्रणांच्या समन्वयाने यशस्वीरित्या पार पाडणेच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव यांनी दिनांक ६.२.२०२६ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये मुददा क्र. 6 मध्ये शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबधित सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये मुददा क्र. 6 (9) नुसार सदर स्पर्धेमध्ये सर्वोत्कृष्ट ठरणारे जिल्हानिहाय 15 विद्यार्थी व सर्वोत्कृष्ट 5 संस्था (शाळा/महाविद्यालये) यांची जिल्हास्तरीय व तालुकास्तरिय निवड समिती गठीत करुन त्याद्वारे सदर स्पर्धकांची निवड करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

तसेच दि. १५.२.२०२६ रोजीच्या इतिवृत्तामध्ये नमूद केल्यानुसार अपर जिल्हाधिकारी, पुणे यांनी जिल्हास्तरीय सर्वोत्कृष्ट ठरणारे शैक्षणिक संस्थांच्या निवडीकरिता निर्धारण करणेत येणा-या कार्यपध्दतीची

मुल्यांकन पध्दत निश्चित करुन दिलेली आहे. सदर मूल्यांकन पध्दतीची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

त्यानुषंगाने संदर्भिय बैठकांध्मये दिलेल्या सूचनेनुसार जिल्हास्तरावर, जिल्हानिहाय 15 विद्यार्थी व सर्वोत्कृष्ट 5 संस्थांची निवड ही अपर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या समन्वयाने करावयाची आहे. वरीलप्रमाणे समितीने मा. अपर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या समन्वयाने विद्यार्थी व महाविद्यालयांच्या निवडीबाबत कार्यवाही करण्यात यावी तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास कळविण्यात यावा.

(डॉ. अशोक उबाळे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

सोबत - वरीलप्रमाणे परिपत्रक.

प्रत - मा. अपर आयुक्त, (सा.प्र.), पुणे विभाग, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

रद्द केला आहे. परंतु वास्तविकपणे फे.नं.58202 ची नोंद ही सहाय्यक धर्मादाय आयु

## "हिंद-दि-चादर" श्री. गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाबाबत.

---

### जिल्हास्तरीय सर्वोत्कृष्ट शैक्षणिक संस्थांच्या निवडीकरिता निर्धारण केलेली मुल्यांकन पद्धती [एकूण ५० गुण ]

१) सहभागी विद्यार्थी संख्या - शाळेच्या एकूण पटसंख्येपैकी उपक्रमात सहभाग नोंदविलेल्या विद्यार्थ्यांच्या टक्केवारीनुसार गुणांकन देणे. [१० गुण]

(१) शाळेतील एकूण विद्यार्थी
(२) पैकी उपक्रमात सहभागी विद्यार्थी
(३) टक्केवारी

९० ते १०० %- १० गुण
७० ते ८९ % - ७ गुण
५० ते ६९ % - ५ गुण
४० ते ४९ % - ३ गुण
३९ आणि त्यापेक्षा कमी - ० गुण

२) राबविण्यात आलेले उपक्रम [१० गुण]

एकूण नमूद उपक्रमांपैकी किती उपक्रम राबविले त्याप्रमाणे गुणांकन देणे. यामध्ये प्रभातफेरी, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, दस्तऐवजीकरण स्पर्धा, वाचन स्पर्धा, भक्ती गीतावर आधारित एकल व समूह गायन स्पर्धा या उपक्रमांचा समावेश आहे. यापैकी प्रत्येक स्पर्धेस १ गुण याप्रमाणे कमाल १० गुण देण्यात येतील.

३) Geo-Tag केलेले फोटो संकेतस्थळावर प्रसिध्द करणे. [१० गुण]

राबविलेल्या प्रत्येक उपक्रमांचे Geo-Tag केलेले फोटो प्रसिद्ध केलेची टक्केवारीनुसार खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील.

९५ ते १०० %- १० गुण
८० ते ९४ % - ९ गुण
७० ते ७९ % - ८ गुण
६० ते ६९ % - ७ गुण

५० ते ५९ % - ६ गुण

४९ आणि त्यापेक्षा कमी - ५ गुण

४) राबविलेल्या उपक्रमांचे व्हिडीओ संकेतस्थळावर प्रसिध्द करणे. [१० गुण]

राबविलेल्या प्रत्येक उपक्रमांचे व्हिडीओ प्रसिद्ध केलेची टक्केवारीनुसार खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील.

९५ ते १०० %- १० गुण

८० ते ९४ % - ९ गुण

७० ते ७९ % - ८ गुण

६० ते ६९ % - ७ गुण

५० ते ५९ % - ६ गुण

४९ आणि त्यापेक्षा कमी - ५ गुण

५) स्पर्धात्मक परिक्षेचे आयोजन करणे. [२ गुण]

वस्तुनिष्ठ बहुपर्यायी ५० प्रश्न असलेल्या स्पर्धात्मक परिक्षेचे आयोजन केले असलेस आणि त्याचे फोटो, व्हिडीओ संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्यास कमाल २ गुण देण्यात येतील.

६) सरताज सिंग यांचे गाणे ऐकविणे . [२ गुण]

सरताज सिंग यांचे गाणे ऐकविणे व त्याचे फोटो, व्हिडीओ संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्यास २ गुण देण्यात येतील.

७) श्री. गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या जीवनकार्यावर आधारीत व्याख्याने आयोजित करणे आणि त्याचे फोटो, व्हिडीओ संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे. [२ गुण]

८) श्री. गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या जीवनकार्यावर आधारीत डॉक्युमेन्ट्री दाखविणे आणि त्याचे फोटो, व्हिडीओ संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे. [१ गुण]

९) नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणे. [३ गुण]

"हिंद-दि-चादर" या कार्यक्रमाच्या अनुषंगाने शैक्षणिक संस्थेमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम राबविला असल्यास आणि त्याचे फोटो, व्हिडीओ संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्यास कमाल ३ गुण देण्यात येतील.

**विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय,**
**विधान भवन पुणे – १ (सामान्य प्रशासन शाखा)**
दुरध्वनी क्र. ०२०-२६३६१०६८
ई-मेल - gb.divcompune@gmail.com

क्र. कार्या/साप्र-२/कावि/८५ /२०२६
दिनांक :- १८/०२/२०२६

**प्रति,**

१. विभागीय सह संचालक (उच्च शिक्षण) पुणे,
२. विभागीय शिक्षण उप संचालक, पुणे,
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)
४. शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, इचलकरंजी, सोलापूर, मिरज-कुपवाड,

**विषय :-** **"हिंद-दी-चादर"** श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त जिल्हानिहाय ५ विद्यार्थी व सर्वोत्कृष्ट ५ संस्था ( शाळा/ विद्यालये) निवड करणेबाबतची कार्यपद्धती बाबतच्या सूचना.....

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र.अविवि-२० २५ /प्र.क्र.२०८/२५/का-५, दिनांक १०/१०/२०२५.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव यांच्या दि. ६.२.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
३.मा. विभागीय आयुक्त, यांच्या दिनांक १५.२.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

२/- उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र.अविवि—२०२५/ प्र.क्र.२०८/२५/का-५,दिनांक १०/१०/२०२५ चे शासन निर्णयानुसार **"हिंद-दी-चादर"** श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या **३५०** व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व नवी मुंबई (जि. ठाणे) येथे राज्यस्तरीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पुणे विभागातील जिल्ह्यांचा समावेश हा **खारघर, नवी मुंबई (जि. ठाणे) येथे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ व १ मार्च २०२६** रोजी आयोजित करणेत आलेल्या कार्यक्रमामध्ये करणेत आलेला आहे.

सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव यांनी दि. ६.२.२०२६ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये मुद्दा क्र. ६ मध्ये शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये मुद्दा क्र. ६(९) नुसार सदर स्पर्धमध्ये सर्वोत्कृष्ट ठरणारे जिल्हानिहाय १५ विद्यार्थी व सर्वोत्कृष्ट ५ संस्था (शाळा/ विद्यालये) यांची निवड जिल्हास्तरीय व तालुकास्तरिय निवड समिती गठीत करून त्याद्वारे सदर स्पर्धकांची निवड करणेबाबत सूचित करणेत आलेले आहे.

तसेच दि. १५.२.२०२६ रोजीच्या इतिवृत्तामध्ये नमूद केल्यानुसार अपर जिल्हाधिकारी पुणे यांनी जिल्हास्तरीय सर्वोत्कृष्ट ठरणारे शैक्षणिक संस्थांच्या निवडीकरिता निर्धारण करणेत येणा-या कार्यपद्धतीची मुल्यांकन पद्धत निश्चित करून दिलेली आहे. सदर मूल्यांकन पद्धतीची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

त्यानुषंगाने संदर्भिय क्र. २ व ३ मधील बैठकांमध्ये दिलेल्या सूचनेनुसार जिल्हास्तरावर, जिल्हानिहाय १५ विद्यार्थी व सर्वोत्कृष्ट ५ संस्थांची निवड हि अपर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या समन्वयाने करणेची कार्यवाही करावी. व केलेल्या कार्यवाहीबाबत मा. विभागीय आयुक्त, कोकण यांना अहवाल सादर करावा. सोबत संदर्भिय क्र.१ ते ३ ची छायांकित प्रत जोडली आहे.

**मा. विभागीय आयुक्त सो यांचे मान्यतेने**

(तुषार ठोंबरे)
**अपर आयुक्त, (सा.प्र.)**
**पुणे विभाग, पुणे**

**प्रत :-** १. मा.जिल्हाधिकारी, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर यांजकडे पुढिल कार्यवाहीसाठी सादर.
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर, यांजकडे पुढिल कार्यवाहीसाठी सादर.

**विभागीय आयुक्त पुणे विभाग,**
**यांचे कार्यालय विधान भवन पुणे-१**
**(सामान्य प्रशासन शाखा)**

दुरध्वनी क्र. ०२०-२६३६१०६८
ई-मेल -gb.divcompune@gmail.com

क्र. कार्या/साप्र-२/आरआर/७२/२०२६
दिनांक - १०.०२.२०२६

प्रति,

१. जिल्हाधिकारी, पुणे / सातारा / सांगली / कोल्हापूर / सोलापूर.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
पुणे / सातारा / सांगली / कोल्हापूर / सोलापूर.
३. पोलीस अधिक्षक, पुणे / सातारा / सांगली / कोल्हापूर / सोलापूर.

**विषय** :- **"हिंद-दी-चादर"** श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या **३५०** व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त खारघर, नवी मुंबई येथे आयोजित कार्यक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाहीबाबत.

**संदर्भ** :- १. महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र. अविवि – २०२५/ प्र.क्र.२०८/२५/का-५, दिनांक १२/०९/२०२५.
२. विभागीय आयुक्त कार्यालय संभाजीनगर, यांचेकडील अशा पत्र क्र.२०२६/साप्र./संकिर्ण/ **"हिंद दी चादर"** दिनांक १८/०१/२०२६.
३. दिनांक ६.२.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

२/- उपरोक्त विषयी संदर्भ क्र.१ चे शासन निर्णयानुसार **"हिंद दी चादर"** श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या **३५०** व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व नवी मुंबई (जि. ठाणे) येथे राज्यस्तरीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, त्याअनुषंगाने संबंधित जिल्ह्यांमध्ये विविध पूरक व जनजागृतीपर उपक्रम राबविण्याचे निर्देश शासनामार्फत देण्यात आलेले आहेत. त्यानुषंगाने दिनांक ६.२.२०२६ रोजी मा. प्रधान सचिव यांनी सूचना दिलेल्या आहेत.

सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने दिनांक ६.२.२०२६ झालेल्या बैठकीचे इतिवृत्त प्राप्त झालेले आहे. सदर इतिवृत्तामध्ये नमुद सर्व सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करून सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. व केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अवगत करावे. सोबत इतिवृत्त जोडले आहे.

(डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार)
विभागीय आयुक्त
**पुणे विभाग, पुणे**

Scanned with CamScanner

## “हिंद-दी-चादर” श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त खारघर, नवी मुंबई येथे आयोजित करावयाच्या कार्यक्रमाबाबत आढावा बैठक.

### -: खारघर, नवी मुंबई येथील कार्यक्रम क्षेत्र बैठकीतील चर्चेचे ठळक मुद्दे :-

**१. विभागीय आयुक्त, कोकण, विभागीय आयुक्त, पुणे व विभागीय आयुक्त, नाशिक: -**

१) विभागीय आयुक्त, कोकण यांनी कार्यक्रम क्षेत्रातील सर्व जिल्ह्यांत कार्यक्रमाच्या अनुषंगाने सर्व निर्देशांचे विभागीय आयुक्त, पुणे व विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या सहकार्याने पालन होतील, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. आवश्यकतेनुसार विभागीय आयुक्त, पुणे व विभागीय आयुक्त, नाशिक यांचे सहकार्य घ्यावे.

२) सर्व कार्यक्रम क्षेत्रात **प्रचार-प्रसिद्धी व जागरणच्या अनुषंगाने सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये, ग्रामपंचायतीमध्ये, आरोग्य केंद्रामध्ये** इ.ठिकाणी कारवाई होत आहे किंवा कसे ? याचे निरीक्षण करणे.

३) प्रचार-प्रसिद्धी व जागरणच्या अनुषंगाने दिनांक १०.०२.२०२६ नंतर **डिजीटल रथ, संत प्रवास वाहने** इ.फिरतील. त्याच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे.

४) लाखो संख्येने येणाऱ्या **भाविकांच्या ने-आणकरीता** आयुक्त, परिवहन व सर्व जिल्हाधिकारी यांच्या समन्वयाने वाहतुकीचे नियोजन करणे.

५) वरील सर्व निर्देशांच्या अंमलबजावणीमध्ये विभागीय आयुक्त, पुणे व विभागीय आयुक्त, नाशिक यांनी आवश्यक ते सर्व प्रशासकीय सहकार्य विभागीय आयुक्त, कोकण यांना करावे.

६) विभागीय आयुक्तांनी आपल्या अधिकार क्षेत्रातील **सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, मनपा आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व अन्य महत्वपूर्ण जिल्हास्तरीय अधिकारी** यांच्यासोबत वेळोवेळी समागम अनुषंगाने आढावा बैठक घ्याव्यात आणि सदर बैठकांचे Geo Tag **केलेले फोटो** https:/gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावर अहवाल अपडेट या **टॅबवर** Event Activity Submission form मध्ये आपण राबवलेल्या उपक्रमाची माहिती Geo Tag **केलेल्या फोटो** सहित अपलोड करावे.

Scanned with CamScanner

## २. जिल्हाधिकारी, रायगड व ठाणे:-

१) **मैदान स्थळ समागमसाठी संपूर्णत: तयार करून तात्काळ ताब्यात देणे.** त्यासाठी आवश्यक सर्व समन्वय व अंमलबजावणी करून घेणे.

२) **विविध विषय समित्या** जसे की, स्वच्छता, वाहतूक, लंगर, पाणी पुरवठा, मैदान स्थळ व्यवस्थापन इ. नोडल अधिकारी नेमून त्यांचा वारंवार आढावा घेणे.

३) आवश्यकतेनुसार शहरातील मंगल कार्यालये, धर्मशाळा, भक्त निवास, निवासी शाळा इ. समागमला येणाऱ्या **स्वयंसेवकांच्या / भाविकांच्या राहण्यासाठी अधिग्रहीत** करून ठेवणे.

४) शहरातील **उद्योग, व्यापार व अन्य क्षेत्रातील प्रतिष्ठीत व्यक्तींना** विविध सेवेच्या माध्यमातून समागमात सहभागी करून घेणे.

५) कार्यक्रम क्षेत्रातील **इतर जिल्हाधिकारी यांच्याशी समन्वय** साधून, समागमात अधिकाधिक भाविक सहभागी होतील, याकरीता प्रयत्न करणे.

६) गृह विभागातील पत्र क्र.एमआयएस-१२२५/प्र.क्र.११४/विशा-५, दिनांक ०२ डिसेंबर, २०२५ च्या अनुषंगाने श्री.**सतिंदर सरताजचे भक्तीगीत सिनेमा गृहात** दाखवणेबाबत उचित कारवाई.

७) आपले अधिनस्त सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका यांचे मार्फत सर्व **नगरपालिका क्षेत्रामध्ये** समागम संबंधाने व्यापक प्रचार प्रसिद्धी करावी.

८) जिल्हानिहाय जागरण, प्रचार व प्रसार समित्या स्थापन कराव्यात त्यामध्ये सिख, सिकलकर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहियाल, वाल्मिकी, उदासिन व भगत नामदेव परंपरा-समाज या समाज बांधवांचा समावेश करावा.

९) आपल्या जिल्ह्यात **डिजीटल प्रचार रथ, संत प्रवास वाहने**, इत्यादी फिरणार आहेत. उपरोक्त ९ समाजाची लोकसंख्या ज्या भागात जास्त आहे त्या भागात सदर प्रचार प्रसार वाहने फिरणार आहेत. त्यानुषंगाने नियोजन करावे.

१०) सिख, सिकलकर, वंजारा, लवाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन, भगत नामदेव (वारकरी) संप्रदाय या ९ समाजाच्या **धार्मिक संस्था, प्रतिष्ठीत व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, संघटना, ट्रस्ट, असोसिएशन, फाऊंडेशन** इत्यादींच्या बैठका घ्याव्यात.

११) शहीदी समागमाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयामध्ये प्रचार-प्रसिद्धी बॅनर लावावे. तसेच जिल्हा माहिती अधिकारी यांना दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करून घ्यावी.

Scanned with CamScanner

३. **जिल्हाधिकारी** (मुंबई शहर, मुंबई उपनगर, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, अहिल्यानगर, नाशिक, धुळे, जळगांव व नंदुरबार):-

१) जिल्हाधिकारी, रायगड यांचेशी समन्वय साधून समागमला येणाऱ्या भाविकांच्या वाहतुकीसंदर्भात नियोजन करणे.

२) जिल्हानिहाय **जागरण, प्रचार व प्रसार समित्या** स्थापन कराव्यात त्यामध्ये सिख, सिकलकर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहियाल, वाल्मिकी, उदासिन व भगत नामदेव परंपरा-समाज या समाज बांधवांचा समावेश करावा.

३) सर्व जिल्ह्यांमध्ये **डिजिटल प्रचार रथ, संत प्रवास वाहने**, इत्यादी फिरतील. उपरोक्त ९ समाजाची लोकसंख्या ज्या भागात जास्त आहे, त्या भागात सदर प्रचार-प्रसार वाहने फिरतील याचे नियोजन करावे.

४) आपले अधिनस्त सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका यांचे मार्फत **सर्व नगरपालिका क्षेत्रामध्ये** व्यापक समागम संबंधाने व्यापक प्रचार प्रसिध्दी करावी.

५) गृह विभागातील पत्र क्र.एमआयएस-१२२५/प्र.क्र.११४/विशा-५, दिनांक ०२ डिसेंबर, २०२५ च्या अनुषंगाने **श्री.सतिंदर सरताजचे भक्तीगीत सिनेमा गृहात** दाखवणेबाबत उचित कारवाई.

६) आपल्या जिल्ह्यात प्रचार-प्रसिद्धी व जागरणाच्या अनुषंगाने **सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण विभागास** दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही होत आहे किंवा नाही ? याची अंमलबजावणी करणे.

७) समागम यशस्वीतेसाठी जिल्हाधिकारी, रायगड यांचेशी आवश्यक समन्वय साधावा.

८) सिख, सिकलकर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन, भगत नामदेव (वारकरी) संप्रदाय या ९ समाजाच्या **धार्मिक संस्था, प्रतिष्ठीत व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, संघटना, ट्रस्ट, असोसिएशन, फाऊंडेशन** इत्यादींच्या बैठका घ्याव्यात.

Scanned with CamScanner

४. आयुक्त, महानगरपालिका (पनवेल) :-

१) **मैदान स्थळ व प्रस्तावित सर्व १४ पार्कींग स्थळ संपूर्णत: स्वच्छ करणे.** समागम दिवशी ५०० स्वच्छता कमी नेमण्याचे नियोजन करणे.

२) रेल्वे स्टेशन, पार्कींग स्थळ व अन्य आवागमन ठिकाणापासून ते समागम स्थळापर्यंत येणाऱ्या **सर्व रस्त्यांची स्वछता करणे, त्या सर्व रस्त्यावरील चौकाचे सुशोभिरण करणे.** सदर रस्ते अतिक्रमण मुक्त करणे.

३) मैदान स्थळाकडे येणाऱ्या सर्व **रस्त्यांची डागडूजी** करणे. विशेषत: टाटा हॉस्पिटलच्या मागील दर्ग्याजवळील रस्त्याची संपूर्णत: डागडूजी करणे.

४) सांडपाण्याची (Drainage) व्यवस्था लवकर लावणे.

५) सदर समागमास २ दिवसात १५ लक्ष भाविक भेट देण्याची शक्यता आहे. त्यानुषंगाने ठिक-ठिकाणी पनवेल महापालिकेमार्फत ५०० Mobile Chemical Toilet बसवण्याचे नियोजन करावे.

६) **अग्निशमन दलाची वाहने** समागम स्थळी विविध ठिकाणी ठेवावीत.

७) प्रसिद्धीच्या अनुषंगाने आपल्या कार्यक्षेत्रातील संपूर्ण **शासकीय, निमशासकीय होर्डींग्जवर** समागम अनुषंगाने प्रसिद्धी द्यावी.

८) आपल्या अखत्यारितील पाणी पुरवठा, स्वच्छता, बांधकाम, शिक्षण, परिवहन इ. व अन्य विभागाचे प्रमुख अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करून त्यांचा वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.

९) आपल्या कार्यक्षेत्रातील शिक्षणाधिकारी यांचेमार्फत शिक्षण विभागास दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

Scanned with CamScanner

## ४ अ) आयुक्त, महानगरपालिका (नवी मुंबई):-

१) **रेल्वे स्टेशन, खारघर, एस.टी.स्टॅन्ड, पनवेल** व नजीकच्या अन्य महत्वाच्या ठिकाणाहून समागम स्थळी येणाऱ्या भाविकांच्या आगमनासाठी **नि:शुल्क शटल बससेवा** उपलब्ध करून देणे.

२) **५०० मोबाईल केमिकल टॉयलेटची** व्यवस्था करणे.

३) कार्यक्रमाच्या ३ दिवसांपूर्वी २०० स्वच्छताकर्मी व प्रत्येक १० स्वच्छताकर्मी मागे एक सुपरवायझर नेमावा.

४) "हिंद-दी-चादर" श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांचे जीवनकाल अधोरेखित करणारे पंजावी पार्श्वगायक **श्री.सतिंदर सरताज यांचे गीत** आपल्या अखत्यारीतील शाळा / महाविद्यालयांमध्ये ऐकवावे.

५) त्यावर गायन स्पर्धेचे आयोजन करावे. तसेच शिक्षण विभागास दिलेल्या इतर सूचनांप्रमाणे कारवाई करावी.

६) आपल्या अधिनस्त जनसंपर्क अधिकारी यांचेमार्फत कार्यक्रमाची व्यापक प्रचार-प्रसिद्धी करावी.

७) आपल्या अधिकार क्षेत्रातील **सर्व शासकीय होर्डिंग्स वर (डिजिटल सहित)**, प्राधान्याने समागम अनुषंगाने जाहिराती लावाव्यात.

Scanned with CamScanner

### ४ ब) आयुक्त, महानगरपालिका (बृहन्मुंबई):-

१) बृहन्मुंबईतून खारघर, नवी मुंबईच्या दिशेने समागम स्थळी येणाऱ्या भाविकांच्या आगमनासाठी **नि:शुल्क बेस्ट बससेवा नेहमीपेक्षा दुप्पट** प्रमाणात उपलब्ध करून देण्यात यावे.

२) "हिंद-दी-चादर" श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांचे जीवनकाल अधोरेखित करणारे पंजाबी पार्श्वगायक **श्री.सतिंदर सरताज यांचे गीत** आपल्या अखत्यारीतील शाळा / महाविद्यालयांमध्ये ऐकवावे.

३) त्यावर गायन स्पर्धेचे आयोजन करावे. तसेच शिक्षण विभागास दिलेल्या इतर सूचनांप्रमाणे कारवाई करावी.

४) आपल्या अधिनस्त जनसंपर्क अधिकारी यांचेमार्फत कार्यक्रमाची व्यापक प्रचार-प्रसिद्धी करावी.

५) आपल्या अधिकार क्षेत्रातील **सर्व शासकीय होर्डिंग्स वर (डिजिटल सहित),** प्राधान्याने समागम अनुषंगाने जाहिराती लावाव्यात.

Scanned with CamScanner

## ४ क) आयुक्त, महानगरपालिका (ठाणे) :-

१) २०० केमिकल टॉयलेटची व्यवस्था करणे.

२) **उल्हासनगर, अंबरनाथ परिसरातून** मोठ्या संख्येने समागम स्थळी येणाऱ्या भाविकांच्या आगमनासाठी **निःशुल्क शटल बससेवा** उपलब्ध करून देण्याचे नियोजन करावे.

३) "हिंद-दी-चादर" श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांचे जीवनकाल अधोरेखित करणारे पंजाबी पार्श्वगायक **श्री.सतिंदर सरताज यांचे गीत** आपल्या अखत्यारीतील शाळा / महाविद्यालयांमध्ये ऐकवावे.

४) त्यावर गायन स्पर्धेचे आयोजन करावे. तसेच शिक्षण विभागास दिलेल्या इतर सूचनांप्रमाणे कारवाई करावी.

५) आपल्या अधिनस्त जनसंपर्क अधिकारी यांचेमार्फत कार्यक्रमाची व्यापक प्रचार-प्रसिद्धी करावी.

६) आपल्या अधिकारक्षेत्रातील **सर्व शासकीय होर्डिंग्स वर (डिजिटल सहित)**, प्राधान्याने समागम अनुषंगाने जाहिराती लावाव्यात.

Scanned with CamScanner

## ४ ड) आयुक्त, महानगरपालिका (कल्याण- डोंबिवली) :-

१) **कल्याण-डोंबिवली परिसरातून** मोठ्या संख्येने समागम स्थळी येणाऱ्या भाविकांच्या आगमनासाठी **नि:शुल्क शटल बससेवा** उपलब्ध करून देण्याचे नियोजन करावे.

२) "हिंद-दी-चादर" श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांचे जीवनकाल अधोरेखित करणारे पंजाबी पार्श्वगायक **श्री.सतिंदर सरताज यांचे गीत** आपल्या अखत्यारीतील शाळा / महाविद्यालयांमध्ये ऐकवावे.

३) त्यावर गायन स्पर्धेचे आयोजन करावे. तसेच शिक्षण विभागास दिलेल्या इतर सूचनांप्रमाणे कारवाई करावी.

४) आपल्या अधिनस्त जनसंपर्क अधिकारी यांचेमार्फत कार्यक्रमाची व्यापक प्रचार-प्रसिद्धी करावी.

५) आपल्या अधिकारक्षेत्रातील **सर्व शासकीय होर्डिंग्स वर (डिजिटल सहित),** प्राधान्याने समागम अनुषंगाने जाहिराती लावाव्यात.

Scanned with CamScanner

**४ इ) आयुक्त, महानगरपालिका** (पुणे / पिंपरी चिंचवड):-

१) **पुणे / पिंपरी चिंचवड परिसरातून** मोठ्या संख्येने समागम स्थळी येणाऱ्या भाविकांच्या आगमनासाठी **निःशुल्क शटल बससेवा** उपलब्ध करून देण्याचे नियोजन करावे.

२) "हिंद-दी-चादर" श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांचे जीवनकाल अधोरेखित करणारे पंजाबी पार्श्वगायक **श्री.सतिंदर सरताज यांचे गीत** आपल्या अखत्यारीतील शाळा / महाविद्यालयांमध्ये ऐकवावे.

३) त्यावर गायन स्पर्धेचे आयोजन करावे. तसेच शिक्षण विभागास दिलेल्या इतर सूचनांप्रमाणे कारवाई करावी.

४) आपल्या अधिनस्त जनसंपर्क अधिकारी यांचेमार्फत कार्यक्रमाची व्यापक प्रचार-प्रसिद्धी करावी.

५) आपल्या अधिकारक्षेत्रातील **सर्व शासकीय होर्डिंग्स वर (डिजिटल सहित),** प्राधान्याने समागम अनुषंगाने जाहिराती लावाव्यात.

Scanned with CamScanner

**४ ई) आयुक्त, महानगरपालिका** (उल्हासनगर, सांगली-मिरज-कुपवाड, नाशिक, अहिल्यानगर, जळगांव, धुळे, नंदुरबार, कोल्हापूर व इचलकरंजी) :-

१) "हिंद-दी-चादर" श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांचे जीवनकाल अधोरेखित करणारे पंजाबी पार्श्वगायक **श्री.सतिंदर सरताज यांचे गीत** आपल्या अखत्यारीतील शाळा / महाविद्यालयांमध्ये ऐकवावे.

२) त्यावर गायन स्पर्धेचे आयोजन करावे. तसेच शिक्षण विभागास दिलेल्या इतर सूचनांप्रमाणे कारवाई करावी.

३) आपल्या अधिनस्त जनसंपर्क अधिकारी यांचेमार्फत कार्यक्रमाची व्यापक प्रचार-प्रसिद्धी करावी.

४) आपल्या अधिकारक्षेत्रातील **सर्व शासकीय होर्डिंग्स वर (डिजिटल सहित),** प्राधान्याने समागम अनुषंगाने जाहिराती लावाव्यात.

Scanned with CamScanner

## ५. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई :-

१) सेक्टर-२९ ओवे मैदान, खारघर, नवी मुंबई येथील **मैदान स्थळ** तसेच मैदान स्थळाच्या नजीकचे सर्व **१४ प्रस्तावित पार्किंग स्थळ** आपल्या अखत्यारीत असल्याने, यांचे **सपाटीकरणसाठी** आवश्यक उपाय योजना करणे.

२) मैदान स्थळावर व जवळपास सर्व पार्किंग स्थळावर **आजुबाजूला डेबरीस** टाकण्यात आले आहे. ते तात्काळ काढण्याची कार्यवाही करावी. पावसामुळे मैदानात व सर्व पार्किंग स्थळावर अनेक ठिकाणी **अल्प चढ-उतार** आहेत. मैदान स्थळ व सर्व पार्किंग स्थळाचे **तात्काळ सपाटीकरण** करावे. सर्व **पार्किंग स्थळाला स्वतंत्र एन्ट्री व एक्झीटचे** नियोजन करावे. त्याचबरोबर नव्याने आजुबाजूला डेबरीस कोणीही टाकणार नाही, यासाठी आवश्यक तेवढी सिडकोची **पुर्णवेळ सुरक्षा व्यवस्था** तैनात करावी.

३) मैदान स्थळाच्या दक्षिण दिशेने पाईपलाईन गेलेली आहे. समागम वेळी मैदानाच्या दोन्ही बाजूने लंगर व्यवस्था असल्याने दोन्ही बाजूने **तात्काळ पाण्याचा स्थायी व निरंतर पुरवठ्यासाठी** पाईपलाईनचे कनेक्शन उभे करणे.

४) समागमास येणाऱ्या स्वयंसेवक व अन्य भाविकांच्या निवास व्यवस्थेसाठी वाशी येथील **सिडको एक्झीबीशन सेंटर** दिनांक २७.०२.२०२६ ते दिनांक ०२.०३.२०२६ पर्यंत आरक्षित करून ठेवावेत. तसेच निकटचे वेगवेगळ्या राज्याचे भवन आरक्षित करून मिळतील, यासाठी समन्वय साधणे.

५) समागमाच्या अनुषंगाने व्यापक प्रचार-प्रसिद्धीसाठी सिडको जनसंपर्क अधिकाऱ्यास निर्देशीत करणे. समागमासाठी तात्पुरते कार्यालय म्हणून **सेंट्रल पार्क प्रशासकीय इमारत आवश्यक फर्निचरसह** उपलब्ध करून देणे.

Scanned with CamScanner

६. शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, आदिवासी विभाग, क्रीडा व युवक कल्याण विभाग आणि कृषी विद्यापीठांशी संबंधित विभागाशी संबंधित मुद्दे :-

१) "हिंद दी चादर" श्री गुरू तेग वहादुर साहीवजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम निमित्य आपल्या विभागातील **सर्व शाळा, महाविद्यालये, विध्यापिठे, आश्रमशाळा, निवासी शाळा, वसतीगृहे, नेहरू युवा संघटन**, NCC, NSS, **स्काऊट गाईड, युवा मंडळे** या व आपल्या आखत्त्यारीतील सर्व संस्थांमध्ये खालील उपक्रम राबवावेत.

२) "हिंद दी चादर" श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या विषयी फ्लायर्स घोषणावाक्य तयार करुन Slogans सह विदयार्थ्यांच्या हातामध्ये देवून, **सकाळी प्रभातफेरी** आयोजित करावी. फ्लायर्स, घोषणावाक्य, Slogans https:/gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावे. सदर उपक्रम अनिवार्य असून रोज राबविण्यात यावे.

३) "हिंद दी चादर" गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे जीवन आणि कार्य यावर आधारित तसेच राज्यातील सिख, सिकलगर, बंजारा लबाना, सिंधी, मोहियाल, वाल्मिकी, उदासिन व भगत नामदेव संप्रदाय समाजांचे गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या सोबत असलेल्या ऐतिहासिक संबंध या विषयावर **वक्तृत्व स्पर्धा, निबंध, गायन, चित्रकला, दस्तऐवजीकरण, वाचन** व इतर स्पर्धा आयोजित करावी. वक्तृत्व स्पर्धा आणि निबंध स्पर्धा यांचे विषय https:/gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावर प्राप्त करुन घ्यावे.

४) श्री.सतींदर सरताज यांचे "हिंद दी चादर" गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवन कालावर आधारित **भक्ती गीत** ऐकवणे. सदर गाण्यावर आधारीत एकल व समूह गायन स्पर्धा आयोजित करणे. सदर उपक्रम अनिवार्य असून रोज राबविण्यात यावे.

५) "हिंद दी चादर" श्री गुरु तेग वहादुर साहिवजी यांच्या जीवनकालावर आधारित **डाक्यूमेंट्री** दाखवणे. सदर उपक्रम अनिवार्य असून रोज राबविण्यात यावे.

६) श्री.गुरु तेग वहादूर साहिबजी यांच्या जीवनकालावर आधारित **वस्तुनिष्ठ बहुपर्यायी ५० प्रश्न असलेल्या स्पर्धात्मक परीक्षेचे** आयोजन करणे.

७) उपरोक्त निर्देशांच्या अनुषंगाने **सर्व साहित्य** gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावर Program Activities या सदराखाली उपलब्ध आहे.

Scanned with CamScanner

८) "हिंद दी चादर" गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमानिमित्त आयोजित केलेल्या सर्व कार्यक्रमांचे फोटो व व्हिडीओ अपलोड करण्याची सुविधा https:/gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावर अहवाल अपडेट या टॅबवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यावर Event Activity Submission form **मध्ये** आपण राबवलेल्या उपक्रमाची माहिती Geo Tag **केलेल्या फोटो सहित** अपलोड करावे.

९) तसेच सदर स्पर्धेमध्ये सर्वोत्कृष्ट ठरणारे जिल्हानिहाय १५ विद्यार्थी व सर्वोत्कृष्ट ५ संस्था (शाळा, विद्यालये) यांची निवड करावी. त्यातील सर्वोत्कृष्ट ५ विद्यार्थ्यांना मा.मुख्यमंत्री, ५ विद्यार्थ्यांना मा.पालकमंत्री व उर्वरीत ५ विद्यार्थ्यांना जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आयोजन व व्यवस्थापन समिती यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात येईल. तसेच जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट ५ संस्थांपैकी २ संस्था यांना मा.मुख्यमंत्री, २ संस्था यांना मा.पालकमंत्री व १ संस्थेला जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात येईल.

यासाठी **जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर निवड समिती** गठीत करून त्याद्वारे सदर स्पर्धकांची निवड करावी.

Scanned with CamScanner

७. **आयुक्त, राष्ट्रीय आरोग्य मिशन, सार्वजनिक आरोग्य, मुंबई / आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई / जिल्हा शल्य चिकित्सक / जिल्हा आरोग्य अधिकारी :-**

१) सदर शहीदी समागमनिमित्ताने दिनांक १०.०२.२०२६ ते दिनांक २५.०२.२०२६ पर्यंत **आरोग्य पंधरवडा** राबवावयाचा असल्याने ठिक-ठिकाणी, गावा-गावात, वस्ती-वस्तींमध्ये विविध **वैद्यकीय शिबीरांचे (Medical Camps)** आयोजन करावे. सदर वैद्यकीय शिबीरांमध्ये शहीदी समागमचे **प्रचार-प्रसिध्दी बॅनर** दर्शनी भागावर प्रमुख स्थळी लावावे.

२) याबाबतीत सर्व आरोग्य केंद्राना, रूग्णालयांना लक्ष्यांक दिले जावे. तसेच यासाठी आवश्यक तेवढा वैद्यकीय मनुष्यबळ जसे की डॉक्टर्स,नर्सेस ईत्यादी जिल्हास्तरावर समन्वयाने उपलब्ध करून घ्यावा. सदर उपक्रम राबवण्यामध्ये जिल्हा स्तरावर उत्कृष्ट ठरणाऱ्या दोन डॉक्टर व दोन कर्मचारी यांचा यथोचित सन्मान राज्यस्तरावर करण्यात येईल.

३) सदर निर्देशांची समागम क्षेत्र अंतर्गत जिल्हयांमध्ये अंमलबजावणी होत आहे कि नाही याबाबतचे संनियंत्रण उपसंचालक, आरोग्य दर्जाच्या अधिकारी यांनी करावे. तसेच जिल्हांतर्गत सनियंत्रण संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावे.

४) "हिंद दी चादर" गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमानिमित्त आयोजित केलेल्या सर्व वैद्यकीय शिबिराचे (Medical Camps) फोटो व व्हिडीओ अपलोड करण्याची सुविधा https:/gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावर अहवाल अपडेट या टॅबवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यावर **Event Activity Submission form** मध्ये आपण राबवलेल्या उपक्रमाची माहिती जीओ टेग केलेल्या फोटो सहित अपलोड करावे.

५) गावो-गावी, वस्ती-वस्तींमध्ये प्रसिद्ध करावयाच्या प्रचार-प्रसिद्धी बॅनरचा नमुना आपल्याला लवकरच पाठविण्यात येईल.

Scanned with CamScanner

ण

## ८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (कार्यक्रम क्षेत्र सर्व जिल्हे)

१) आपल्या अधिनस्त शिक्षणाधिकारी यांचा वेळोवेळी आढावा घेऊन, त्यांना दिलेल्या सुचनांची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलवजावणी करावी.

२) सर्व गट विकास अधिकारी यांच्यामार्फत "हिंद दी चादर" श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी वर्षानिमित्त सर्व **ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभेचे आयोजन** करून समागमाबाबत प्रचार व प्रसिद्धी करणे.

३) श्री.सतींदर सरताज यांचे "हिंद दी चादर" गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवन कालावर आधारित भक्ती गीत **ग्रामपंचायत मधील लाऊड स्पीकर** वरती ऐकवणे. सदर उपक्रम अनिवार्य असून रोज राबविण्यात यावे.

४) "हिंद दी चादर" श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी वर्षानिमित्त खारघर, नवी मुंबई येथील प्रस्तावित समागमचे **प्रचार प्रसिद्धी बॅनर** गावामध्ये प्रवेशाच्या व अन्य महत्वाच्या ठिकाणी लावावे. सदर नमुना बैनेर सोबत जोडलेले आहे.

५) "हिंद दी चादर" श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी वर्षानिमित्त सर्व ग्रामपंचायत मध्ये दररोज **सकाळी स्वच्छता मोहीम** राबवावी.

६) सर्व शाळांमध्ये "हिंद दी चादर" श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी वर्षानिमित्त शिक्षण विभागास दिलेल्या निर्देशाचे अमलबजवानी होत आहे की नाही याची पाहणी करणे.

**७) वरील सर्व उपक्रमात जिल्हा स्तरावर उत्कृष्ट ठरणाऱ्या ५ ग्रामपंचायतींची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी करावी. सदर ग्रामपंचायतीना राज्य स्तरावर सन्मानित करण्यत येईल.**

Scanned with CamScanner

## ९. परीवहन विभाग :-

१) कार्यक्रम क्षेत्रातील सर्व जिल्ह्यातून समागमाला मोठ्याप्रमाणात उपस्थित राहणाऱ्या भाविकांच्या आवागमनासाठी समाजातून आव्हान करून वाहन उपलब्ध करून द्यावे. यासाठी **स्कूल बसेस, उद्योग समूहाच्या बसेस, महापालिकेच्या बसेस** व अन्य वाहनांना प्राधान्य द्यावे.

२) समागम दिवशी शहरातील वाहतुकीच्या अचूक नियोजनसंदर्भाने पोलीस प्रशासनाशी समन्वय साधावा.

Scanned with CamScanner

## १०. पोलीस यंत्रणेसाठी सर्वसाधारण सूचना :-

१) सुरक्षा- कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने, योग्य तो संपूर्ण बंदोबस्त पुरवणे.

२) समागमस्थळी **वाहतूक आणि वाहन पार्कींगचे सूक्ष्म नियोजन** करणे.

३) कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने सर्व खबरदारी घेणे.

४) गृह विभागातील पत्र क्र.एमआयएस-१२२५/प्र.क्र.११४/विशा-५, दिनांक ०२ डिसेंबर, २०२५ च्या अनुषंगाने **श्री.सतिंदर सरताजचे भक्तीगीत सिनेमा गृहात** दाखवणेबाबत उचित कारवाई.

Scanned with CamScanner

## ११. जिल्हा माहिती अधिकारी (कार्यक्रम क्षेत्र सर्व जिल्हे) :-

१) समागमाच्या अनुषंगाने आपल्या जिल्हयातील **Print, Digital, Social, FM, Youtube, influencer,** Electronic **ई माध्यमांवर व्यापक प्रसिध्दी** देणे.

२) सिख, सिकलकर, बंजारा, लवाना, सिंधी, मोहियाल, वाल्मिकी, उदासिन व भगत नामदेव परंपरा-समाज या सर्व समाजातील Print, Digital, Social, FM,Youtube, influencer, Electronic इत्यादी समाज माध्यमातील आपल्या जिल्हयातील प्रतिनिधींची यादी बनविणे व सदर प्रचार प्रसध्दिी मध्ये त्यांचा सक्रीय सहभाग नोंदविणे.

३) रायगड येथील नियोजित **समागम स्थळी सुरु असलेल्या तयारीची** जिल्हा माहिती अधिकारी, रायगड यांचेशी समन्वय साधून, माहिती मिळवणे व त्याची व्यापक प्रसिध्दी आपापल्या जिल्ह्यात देणे.

४) आपल्या जिल्ह्यातील **शासकीय, निमशासकीय व खाजगी होर्डींग्ज** तसेच जिल्ह्यातील महत्वाचे स्थळ यांची यादी बनविणे. त्या ठिकाणी समागमसंबंधाने जाहीरातीचे नियोजन करणे.

*************

Scanned with CamScanner

## बैठकीचे इतिवृत्त

विषय: "हिंद-दी-चादर" श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत आढावा बैठक.

- **अध्यक्ष:** डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे
- **दिनांक व वेळ:** १५ फेब्रुवारी २०२६, सकाळी १०.४५ वाजता (व्ही.सी. द्वारे).
- **उपस्थित:** पुणे विभागातील, जिल्हाधिकारी, सर्व निवासी उपजिल्हाधिकारी, महानगरपालिका उपआयुक्त, सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.), प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी, जन संपर्क अधिकारी, महानगरपालीका व इतर संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी.

**बैठकीतील महत्त्वाचे निर्देश:**

१. **कार्यक्रमाची पार्श्वभूमी व महत्त्व**

- ऐतिहासिक महत्त्व: श्री गुरु तेग बहादुर साहेब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त "हिंद-दी-चादर" हा भव्य कार्यक्रम नवी मुंबई येथे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ व १ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे.
- व्हीव्हीआयपी उपस्थिती: या कार्यक्रमास माननीय पंतप्रधान, माननीय केंद्रीय गृहमंत्री, माननीय मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि राज्याचे संपूर्ण मंत्रिमंडळ उपस्थित राहणार आहे.
- नियोजनाचा दर्जा: कार्यक्रमाची ऐतिहासिक भव्यता आणि व्यापकता लक्षात घेऊन क्षेत्रीय स्तरावर अत्यंत सूक्ष्म (Micro) आणि बारकाईने नियोजन करणे अनिवार्य आहे.

२. **क्षेत्रीय समन्वय व समाज प्रमुखांशी संवाद**

- जिल्हा व क्षेत्रीयस्तरावर विविध ९ समाजाच्या संघटनांची यादी तयार करावी. तसेच प्रत्येक जिल्हा पातळीवरील विविध समाजाचे समन्वयक यांची यादी व भ्रमणध्वनी याआधीच उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्याप्रमाणे संपर्क करणेत यावा.
- तातडीच्या बैठका: ज्या क्षेत्रीय स्तरावर अद्याप शीख व इतर समाजातील प्रमुख नेत्यांची बैठक झालेली नसेल, तिथे तात्काळ अशा बैठकांचे आयोजन करावे.
- नियोजन: संबंधित क्षेत्रातील गुरुद्वारा प्रमुखांशी प्रत्यक्ष चर्चा करून नवी मुंबईला जाणाऱ्या भाविकांचा वस्तुनिष्ठ अंदाज निश्चित करावा.
- पुणे व पिंपरी-चिंचवड विशेष लक्ष्य: या भागात शीख बांधवांची संख्या मोठी असल्याने महापालिका आयुक्तांनी जिल्हाधिकारी पुणे यांच्या समन्वयाने किमान २०० बसेस नवी मुंबईसाठी जातील असे चोख नियोजन करावे.

३. **शिक्षण विभाग व विद्यार्थ्यांचा सहभाग (सविस्तर उपक्रम)**

विद्यार्थ्यांमध्ये या इतिहासाचा प्रसार करण्यासाठी तसेच कार्यक्रमाचा प्रचार प्रसार करण्यासाठी शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, आश्रमशाळा आणि वसतिगृहे यांच्यात खालील स्पर्धांचे आयोजन करावे:

- स्पर्धेचे प्रकार: वक्तृत्व, निबंध, गायन, चित्रकला, (Documentation), वाचन स्पर्धा, एकल व भक्तीगीत गायन.
- परीक्षा: वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्पर्धात्मक परीक्षांचे आयोजन करावे.

- माहितीपट दाखवावेत.
- डिजिटल नोंदणी: सर्व उपक्रमांचे जिओ-टॅग (Geo-tag) फोटो आणि व्हिडिओ शासन संकेतस्थळावर मोठ्या संख्येने अपलोड करावेत.
- निवड व शिफारस: जिल्हास्तरावर सर्वोत्तम १५ विद्यार्थी आणि ५ शैक्षणिक संस्थांची (शाळा/महाविद्यालय/विद्यापीठ) निवड करावी. या विद्यार्थ्यांची शिफारस राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत (NEP) केंद्र शासनाकडे केली जाणार आहे.
- सर्वोकृष्ठ संस्थांच्या निवडीकरीता मुल्यांकनाकरीता आवश्यक पध्दती अपर जिल्हाधिकारी पुणे व सांगली यांनी आज सायंकाळी ५.०० वाजेपूर्वी निर्धारीत करुन द्यावी. त्याचा अवलंब करावा.

४. **ग्रामपंचायत व जिल्हा परिषद स्तरावरील उपक्रम**

- विशेष ग्रामसभा: जिल्हा परिषद स्तरावर ग्रामपंचायतींसाठी विशेष ग्रामसभांचे आयोजन करावे.
- प्रसिद्धी: ग्रामपंचायत कार्यालयावर लाऊडस्पीकरद्वारे भक्तीगीते ऐकवावीत व सर्वत्र बॅनर लावावेत.
- स्वच्छता मोहीम: गावागावांत विशेष स्वच्छता मोहीम राबवून त्याचे जिओ-टॅग फोटो व व्हिडिओ वेबसाईटवर अपलोड करावेत.
- पुरस्कार: उत्कृष्ट कार्य करणाऱ्या 5 ग्रामपंचायतींची जिल्हास्तरावर निवड करावी.
- सर्वोकृष्ठ ग्रामपंचायत निवडीकरीता मुल्यांकनाकरीता आवश्यक पध्दती अपर आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी आज सायंकाळी ५.०० वाजेपूर्वी निर्धारीत करुन द्यावी. त्याचा अवलंब करावा.

५. **आरोग्य विषयक उपक्रम व शिबिरे**

- आरोग्य सप्ताहाचे आयोजन करणेत यावेत.
- वैद्यकीय शिबिरे: प्रत्येक गावात आणि वस्तीमध्ये विशेष वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करून जास्तीत जास्त नागरिकांना सहभागी करून घ्यावे.
- प्रसिद्धी: शिबिर स्थळी दर्शनी भागात कार्यक्रमाचे प्रसिद्धी बॅनर लावणे अनिवार्य आहे.
- फोटो/व्हिडिओ: या सर्व उपक्रमांचे चित्रीकरण करून वेबसाईटवर अपलोड करावे.
- सन्मान: जिल्हास्तरावर उत्कृष्ट ठरणाऱ्या 2 डॉक्टरांची आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची नावे निश्चित करावीत.

६. **तांत्रिक दस्तऐवजीकरण आणि नोडल अधिकारी**

- वेबसाईट रिपोर्टिंग: केवळ कार्यक्रम घेणे पुरेसे नाही, तर त्याचे डॉक्युमेंटेशन करून ते दररोज (Daily) वेबसाईटवर अपलोड करावे.
- जबाबदारी: निवासी उपजिल्हाधिकारी यांनी मनपा, जि.प., शिक्षण विभाग आणि ग्रामपंचायतींच्या माहितीचे संकलन करून अपलोड करण्याची जबाबदारी पार पाडावी.
- नोडल अधिकारी: जिल्ह्याचे अप्पर जिल्हाधिकारी हे 'नोडल अधिकारी' म्हणून सर्व यंत्रणांच्या कार्यवाहीवर नियंत्रण व समन्वय ठेवतील.

७. **वाहतूक, लॉजिस्टिक आणि CSR नियोजन**

- बस व्यवस्था: भाविकांच्या प्रवासासाठी लागणाऱ्या वाहनांसाठी CSR (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) अंतर्गत औद्योगिक संस्था आणि दानशूर उद्योजकांशी एमआयडीसी प्रादेशिक अधिकारी व संबंधित महापालीका अधिकारी यांनी संपर्क साधावा.

- प्रसिद्धी: बसेसवर संबंधित उद्योजकांचे/संस्थांचे बॅनर लावता येतील.
- RTO समन्वय: जिल्हा RTO ने पनवेल RTO यांच्याशी संपर्क साधून कोणत्या तारखेला किती बसेस येणार आहेत, भाविकांची संख्या किती असणार आहे, तसेच प्रत्येक बसे करीता असलेल्या समन्वय अधिकाऱ्याचे नाव, मोबाईल क्रमांक, वाहन चालकांचे नाव व मोबाईल क्रमांक याची माहिती द्यावी जेणेकरून पार्किंग व वाहतुकीचे नियोजन सुलभ होईल.
- कोकण आयुक्त कार्यालय समन्वय: भाविकांची संख्या आणि त्यांच्या मुक्कामाचा कालावधी याबाबतची माहिती विभागीय आयुक्त (कोकण) यांना कळवणे आवश्यक आहे.

८. **सोलापूर जिल्ह्यासाठी विशेष सूचना**

- सोलापूरचे नागरिक नांदेड येथील गुरुद्वारात जाण्याची शक्यता असली तरी, जे नागरिक तिथल्या अडचणींमुळे जाऊ शकणार नाहीत, त्यांच्यासाठी नवी मुंबई येथील कार्यक्रमाचे सोलापूर जिल्हा प्रशासनाने चोख नियोजन करावे.

९. **मा. मुख्यमंत्री आढावा आणि तातडीची डेडलाईन**

- गुगल स्प्रेडशीट: सामान्य प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी दिलेल्या स्प्रेडशीटमध्ये अद्याप एकाही जिल्ह्याने माहिती भरलेली नाही. आज १५ फेब्रवारी २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपूर्वी ही माहिती कोणत्याही परिस्थितीत अपडेट करावी. तसेच संकेतस्थळावर अद्यावत माहिती भरावी. याकरीता स्वतंत्र अधिकारी व स्वतंत्र पथकांची नियुक्ती करुन निवासी उपजिल्हाधिकारी यांनी स्वत: नियंत्रण करावे व अपर जिल्हाधिकारी यांनी समन्वय ठेवावा.
- उपरोक्त कार्यक्रमाचे अनुषंगाने दिनांक ०६.०२.२०२६ व ११.०२.२०२६ रोजी सर्व जिल्हयाच्या क्षेत्रीय अधिकारी तसेच महापालीका अधिकाऱ्यांसोबत नियोजनाबाबत बैठक घेवून यापूर्वीच सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या सूचना व उपरोक्त सूचनांचा गांभीर्याने अंमल करण्यात यावा.
- अंतिम आढावा: उद्या १६ फेब्रुवारी २०२६ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय स्वतः या नियोजनाचा सविस्तर आढावा घेणार आहेत.

15.2.2026

**(डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार)**
**विभागीय आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

प्रति,

सर्व संबंधित